21-04-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 20-04-2025 21:19 Page 1



मडगाव नगरपरिषदेच्या दुर्दशेवर पुन्हा सवाल
» पान ३ वर


आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com


पाकिस्तानचा भारतात वर्ल्ड कप खेळायला नकार!
» पान ४ वर

वेर्णा, सोमवार, २१ एप्रिल २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 228 | Verna, | facebook.com/dainikherald | Monday 21 April 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### जम्मू-काश्मीरमध्ये ढगफुटी, तिघांचा मृत्यू

**जम्मू, दि. २०** : गेल्या काही दिवसांपासून जम्मू-काश्मीरमध्ये पाऊस पडत आहे. रविवारी सकाळी रामबन जिल्ह्यातील सेरी बागना भागात पावसानंतर झालेल्या ढगफुटीत तीन जणांचा मृत्यू झाला. ढगफुटीमुळे अचानक पूर आल्याचे सूत्रांनी सांगितले. डोंगरावरून आलेला ढिगारा गावाकडे आला. सध्या बचावकार्य सुरू आहे.

दुसरीकडे, रामबन जिल्ह्यातील बनिहाल परिसरात अनेक ठिकाणी भूस्खलनाच्या घटना घडल्या आहेत. यामुळे जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आला आहे. शेकडो वाहने अडकली आहेत. किश्तवार-पद्दर रस्ता देखील बंद आहे. येथे वाहनांची वाहतूक थांबवण्यात आली आहे. हवामान स्वच्छ झाल्यानंतरच महामार्गावरून प्रवास करण्याचे आवाहन अधिकाऱ्यांनी केले आहे. काही भागात, डोंगराचा ढिगारा रस्ते आणि निवासी भागात पोहोचला आहे. एका व्हिडिओमध्ये तीन-चार टँकर आणि काही इतर वाहने पूर्णपणे ढिगाऱ्याखाली गाडलेली दिसत आहेत. याशिवाय, हॉटेल्स आणि घरांनाही ढिगाऱ्यांचा फटका बसल्याचे दिसून येत आहे.

---

### कुलभूषणांचा 'अपील'चा अधिकार नाकारला

**कराची, दि. २०** : पाकिस्तानच्या तुरुंगात असणारे भारतीय नागरिक कुलभूषण जाधव यांच्याबाबत पाकिस्तानने पुन्हा एकदा रडीचा डाव खेळला आहे. त्यांना अपील करण्याचा अधिकार नाकारला आहे. ते भारतीय गुप्तहेर असल्याचा पाकिस्तानचा आरोप आहे. कुलभूषण जाधव यांना आंतरराष्ट्रीय न्यायालय (आयसीजे) ने केवळ कॉन्सुलर ॲक्सेस देण्याचा आदेश दिला होता. त्या निर्णयामध्ये त्यांना अपील करण्याच्या अधिकाराचा उल्लेख नव्हता, असे पाकिस्तानच्या संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे. माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या अटकेनंतर ९ मे २०२३ रोजी पाकिस्तानमध्ये हिंसाचार उसळला होता. यावेळी झालेल्या निदर्शनांमध्ये सहभागी असल्याचा आरोपींच्या खटल्याची सुनावणी सर्वोच्च न्यायालय करत होते. भारतीय नागरिक कुलभूषण जाधव यांना अपील करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

---

### चॅटजीपीटीने टिकटॉकला टाकले मागे

**नवी दिल्ली, दि. २०** : मार्च महिन्यात घिबली स्टुडिओ आर्ट ट्रेंड आणणाऱ्या चॅटजीपीटीने एक नवा विक्रम केला आहे. चॅटजीपीटीने सर्वाधिक डाऊनलोड करण्याचा नवा रेकॉर्ड केला असून यात इन्स्टाग्राम आणि टिकटॉकला मागे टाकले आहे. गेम्स वगळता, चॅटजीपीटी हे जगातील सर्वाधिक डाऊनलोड केलेले ॲप बनले आहे, ज्याने ४६ दशलक्ष नवीन डाऊनलोड्स नोंदवले. इंस्टाग्राम आणि टिकटॉक गेल्या अनेक वर्षांपासून ॲप डाऊनलोडच्या यादीत आघाडीवर होते. परंतु, आता चॅटजीपीटीमध्ये मार्च महिन्यात घिबली स्टुडिओ आर्ट टूल जोडले गेले. तेव्हापासून ते डाउनलोड करणाऱ्यांची संख्या सतत वाढत आहे.

**हवामान**

कमाल : ३४ किमान : २१
आर्द्रता : ६९

**बाजार भाव**

सोने : ₹९८,१०० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ९९,१०० (१ किलो)

**शेअर मार्केट**

सेन्सेक्स : ७८,३६५ .७७↑ (३१.१६ )
निफ्टी : २३,२३५.९० ↑ (८३.९५)

# आंबेडे हादरले ! वडिलांनीच रचला मुलाच्या हत्येचा कट !

## श्रवण बर्वे हत्याप्रकरणी वडील, भावाला अटक | वासुदेवच्या जबाबातून धक्कादायक खुलासे

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २० :आंबेडेमधील २४ वर्षीय श्रवण बर्वेच्या हत्येचा कट त्याच्या कुटुंबीयांनीच रचल्याची धक्कादायक माहिती पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आल्यामुळे संपूर्ण आंबेडे गाव हादरून गेले आहे. या भयानक हत्येप्रकरणी पोलिसांनी देविदास बर्वे (वडील) आणि त्याचा मोठा मुलगा उदय बर्वे (भाऊ) यांना शनिवारी रात्री अटक केली. त्यामुळे या गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्यांची संख्या आता ३ झाली आहे.**

हत्येमागील हेतू अद्याप अस्पष्ट असला तरी, उत्तर गोवा पोलिस अधीक्षक अक्षत कौशल यांनी रविवारी माध्यमांना सांगितले की, तपास वेगाने सुरू आहे आणि नवीन तपशील समोर येत आहेत. श्रवण बर्वेची हत्या हा एक सुनियोजित आणि थंड रक्ताचा कट आहे, असे आतापर्यंतच्या तपासात समोर आले आहे.

१५ एप्रिल रोजी, वाळपई पोलिसांना आंबेडे येथील एका मंदिराजवळ मृतदेह आढळल्याची माहिती मिळाली. पोलिस अधिकारी आणि फॉरेन्सिक तज्ज्ञांचा समावेश असलेले एक पथक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी प्राथमिक तपास केला. मृताची ओळख त्याच्या नातेवाईकांनी आंबेडे येथील २४ वर्षीय स्थानिक रहिवासी श्रवण बर्वे अशी केली.

प्राथमिक तपासणी आणि पंचनाम्यात (घटना तपासणी) संशयास्पद परिस्थिती आढळून आली. फॉरेन्सिक शिफारसीनुसार, प्रकरण तातडीने खुनाच्या तपासात रूपांतरित करण्यात आले आणि त्याचदिवशी दुपारी २ वाजता अज्ञात



व्यक्तींविरुद्ध (बीएनएस) कलम १०३ अंतर्गत एफआयआर दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता, विशेष तपास पथक (एसआयटी) तातडीने तयार करण्यात आले. पथकात पर्वरी आणि डिचोलीचे एसडीपीओ, डिचोली आणि वाळपई पोलिस निरीक्षक यांचा समावेश होता.

तपासकर्ते सुगावा मिळविण्यासाठी धडपडत असताना, स्थानिक रहिवाशांनी पोलिसांचे त्या रात्री झालेल्या वाढदिवसाच्या पार्टीकडे लक्ष वेधले. ही पार्टी श्रवणच्या घराजवळ आणि त्याचा मृतदेह सापडल्याच्या ठिकाणाजवळच होती. पार्टीतील उपस्थितांना - जे आयपीएल सामना पाहण्यासाठी उशिरापर्यंत थांबले होते - चौकशी केल्यावर पोलिसांनी एक महत्त्वाचा सुगावा शोधला. कार्यक्रमादरम्यान श्रवणला जवळून चालताना पाहिल्याचे अनेक साक्षीदारांनी सांगितले. यामुळे तपासात एक मोठी प्रगती झाली: १८ एप्रिल रोजी आंबेडे येथील रहिवासी आणि रोजंदारी कामगार ४३ वर्षीय वासुदेव ओझेकर याला अटक करण्यात आली. या प्रकरणात ही पहिलीच अटक होती.

कठोर चौकशीदरम्यान वासुदेवने हत्येतील आपली भूमिका कबूल केली. पण त्यानंतर जे घडले ते तपासकर्त्यांना चकित करणारे होते. त्याने दोन साथीदारांची नावे घेतली: श्रवणचे वडील देविदास बर्वे आणि भाऊ उदय बर्वे.

वासुदेवच्या जबाबानुसार, श्रवणच्या हत्येची योजना

पान २ ▶



# कला अकादमीचा एसी बंद; प्रेक्षकांचा अर्धा तास खोळंबा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २० :** कला अकादमी सभागृहात रविवारी सायंकाळी सादर होणाऱ्या 'श्रीमान दामोदर पंत' या नाटकाच्या प्रेक्षकांना तांत्रिक समस्यांचा सामना करावा लागला. नाटकाच्या प्रारंभाच्या वेळेला एसी बिघाडामुळे नाटक उशिरा सुरू झाले. नाटकाची सुरूवात दुपारी ३:३० वाजता होणार होती मात्र प्रेक्षागृहांतील एसी बंद पडल्यामुळे नाटक संध्याकाळी ४:१५ वाजता सुरू झाले.

यापूर्वी, मागील गुरुवारी कला अकादमीमध्ये शरद पोंक्षे यांचे 'पुरुष' नाटक सुरू असताना, अचानक बिघाड होऊन दिवे मंद झाले होते, ज्यामुळे नाटक थांबवावे लागले. त्यानंतर, आठवड्याच्या अंतराने, 'श्रीमान दामोदर पंत' नाटकाच्या सुरुवातीला एसी बंद पडला आणि तो दुरूस्त करण्यात अर्ध्या तासापेक्षा अधिक वेळ लागला.

या तांत्रिक समस्यांमुळे तिकीट खरेदी करणाऱ्या प्रेक्षकांना खूप निराशा झाली. नाटक सुरू झाल्यानंतरही सभागृहात योग्य थंड हवा नाही अशी तक्रार प्रेक्षकांनी केली. तसेच, कलाकारांनी सादरीकरणाच्या संदर्भात सदोष प्रकाशयोजना, ध्वनी व्यवस्था आणि एसीची तांत्रिक अडचण याबद्दल तक्रारी केल्या. या तक्रारींची सत्यता प्रेक्षकांनाही अनुभवता आली.

कोट्यवधी रुपये खर्च करूनही कला अकादमी अद्यापही सुव्यवस्थित नाही याबद्दल नाट्यरसिकांनी अतिशय संतप्त प्रतिक्रीया व्यक्त केल्या. सरकारला थोडी तरी लाज असेल तर कला अकादमीला या दुर्दशेतून बाहेर काढावे एवढीच आमची माफक अपेक्षा असल्याचे नाराज नाट्यरसिकांनी बोलून दाखवले.

# महाकुंभ आयोजनावरून अखिलेशांचा भाजपवर आरोप

**प्रयागराज, दि. २० :**

उत्तर प्रदेशातील महाकुंभमेळ्याच्या आयोजनावरून समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी योगी आदित्यनाथ सरकारवर तीव्र शब्दांत टीका केली आहे. कुंभमेळ्याचा उपयोग भाजपने राजकीय मंच म्हणून केल्याचा आरोप करत यादव यांनी सांगितले की, हा धार्मिक नव्हे तर पक्षीय हितसंबंधांसाठी वापरलेला राजकीय कार्यक्रम होता.

कन्नौजचे खासदार आणि माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी प्रयागराज येथे पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, महाकुंभाचे आयोजन अत्यंत गैरव्यवस्थित होते. मुख्यमंत्री स्वतः या अपयशासाठी जबाबदार आहेत. धार्मिकतेच्या आडून भाजपने त्याचा राजकीय प्रचारासाठी वापर केला. इतकेच नव्हे तर, या व्यासपीठावरून पुढील पंतप्रधानांची घोषणा करण्याची तयारी होती.

या वक्तव्याची पार्श्वभूमी २९ जानेवारी रोजी प्रयागराजमध्ये घडलेल्या चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेची होती, ज्यामध्ये किमान ३० जणांचा मृत्यू झाला होता आणि अनेक भाविक जखमी झाले होते. या घटनेमुळे देशभरात संताप व्यक्त करण्यात आला होता तसेच महाकुंभ मेळाव्याच्या सुरक्षाव्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले होते.

यादव यांनी सरकारवर मृतांची संख्या आणि संबंधित आर्थिक माहिती लपवण्याचा आरोप करत सांगितले की, शोकाकुल कुटुंबांवर मृत्यू प्रमाणपत्रात फेरबदल करण्याचा दबाव टाकण्यात आला. ही प्रशासनाची असंवेदनशीलता दर्शवते. तसेच, मेळाव्याच्या ठिकाणी ड्रोन आणि सीसीटीव्ही सारखी देखरेखीची साधने कार्यान्वित नसल्याचाही त्यांनी आरोप केला. यामुळे, सुरक्षेबाबतची सरकारची तयारी आणि जबाबदारी यावर प्रश्नचिन्ह उभे राहते, असे ते म्हणाले. यादव यांनी यावेळी २०१३ मधील महाकुंभाच्या व्यवस्थापनाचा दाखला देत हार्वर्ड विद्यापीठाच्या त्या आयोजनावरील अभ्यासाचा संदर्भ दिला. २०१३ मध्ये सुयोग्य नियोजनामुळे मेळा यशस्वी झाला. त्याच्या तुलनेत यंदाचे आयोजन हे अपयशी ठरले आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी २०२५ च्या कुंभासाठी ऑनलाइन दिल्या जाणाऱ्या सूचनांचे पुस्तिकेचेही प्रकाशन केले.

२०२७ मध्ये आमचा पक्ष सत्तेत आला, तर महाकुंभातील सर्व घडामोडींची सखोल चौकशी केली जाईल, असे आश्वासनही यादव यांनी यावेळी दिले. दुर्घटनेनंतर तत्काळ प्रतिक्रिया देताना यादव यांनी जागतिक दर्जाचे दावे करणाऱ्या अधिकाऱ्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून आपल्या पदांचा राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. तसेच, कुंभाचे आयोजन लष्कराच्या नियंत्रणाखाली देण्याची सूचनाही त्यांनी मांडली. दरम्यान, भाजपने यादव यांचे आरोप फेटाळले आहेत.

# भाजप खासदार निशिकांत दुबे यांचा माजी निवडणूक आयुक्तांवर गंभीर आरोप

**नवी दिल्ली, दि. २० :**

भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी माजी मुख्य निवडणूक आयुक्त एस. वाय. कुरेशी यांच्यावर रविवारी जोरदार टीका करत त्यांना निवडणूक आयुक्त नव्हे, मुस्लिम आयुक्त असे संबोधले. वक्फ (सुधारणा) कायद्यावर कुरेशी यांनी केलेल्या टिप्पणीच्या पार्श्वभूमीवर दुबे यांनी हे वक्तव्य केल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे.

कुरेशी यांनी १७ एप्रिल रोजी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत वक्फ (सुधारणा) कायद्यावर टीका केली होती. त्यांनी या कायद्याला मुस्लिम जमिनी हडप करण्याची सरकारची अत्यंत घृणास्पद आणि दुष्ट योजना असे संबोधले होते. त्यांनी विश्वास व्यक्त केला होता की सर्वोच्च न्यायालय हा कायदा रद्द ठरवेल. या टीकेला प्रत्युत्तर देताना दुबे यांनी कुरेशींवर पक्षपाती कारभाराचा आरोप केला. तुम्ही निवडणूक आयुक्त नव्हता, मुस्लिम आयुक्त होता. तुमच्या कार्यकाळात झारखंडच्या संथाल परगणामध्ये मोठ्या प्रमाणावर बांगलादेशी घुसखोरांना मतदार बनवण्यात आले, असा दावा दुबे यांनी केला.

त्यांनी आपल्या विधानांत ऐतिहासिक संदर्भही दिले. पैगंबर मुहम्मद यांचा इस्लाम भारतात ७१२ मध्ये आला. त्यापूर्वी वक्फ जमीन ही हिंदू, बौद्ध, जैन किंवा आदिवासी समुदायाची होती, असे ते म्हणाले. त्यांनी पुढे नमूद केले की, माझे गाव विक्रमशिला ११८९ मध्ये बख्तियार खिलजीने जाळले होते. त्याच विक्रमशिला विद्यापीठाने जगाला पहिले कुलगुरू आतिश दीपांकर दिले होते.

दुबे यांच्या या विधानांवर काँग्रेस आणि आम आदमी पार्टीसह अनेक विरोधी पक्षांनी कडाडून टीका केली आहे. विरोधकांनी त्यांच्या विधानांना न्यायालयीन स्वातंत्र्यावर हल्ला ठरवत निषेध व्यक्त केला आहे.

याआधीही दुबे यांनी सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि सर्वोच्च न्यायालयावर जोरदार टीका केली होती. त्यांनी न्यायालयावर धार्मिक युद्धांना चिथावणी देत असल्याचा आरोप करत न्यायालयाच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. जर सर्वोच्च न्यायालय कायदे करत असेल, तर संसद बंद करावी, असे ते म्हणाले होते.

दुबे यांनी समलैंगिकतेला गुन्हेगारीमुक्त ठरवणाऱ्या आणि धार्मिक बाबतीतील न्यायालयीन निर्णयांवरही प्रश्न उपस्थित केले होते. सर्वोच्च न्यायालय देशाला अराजकतेकडे नेत आहे, असा गंभीर आरोप त्यांनी केला होता.

वक्फ (सुधारणा) कायदा, २०२५ च्या घटनात्मक वैधतेवर सर्वोच्च न्यायालयात सध्या सुनावणी सुरू आहे. या पार्श्वभूमीवर दुबे यांच्या विधानांमुळे वातावरण तापले आहे.

दरम्यान, भाजपने दुबे यांच्या विधानांपासून स्वतःला दूर ठेवत पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. पक्षाध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी यावर प्रतिक्रिया देताना सांगितले की, ही दुबे यांची वैयक्तिक मते आहेत. न्यायपालिका ही लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे आणि पक्ष तिच्या स्वायत्ततेबाबत पूर्ण वचनबद्ध आहे. तसेच पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना अशा प्रकारच्या वक्तव्यांपासून दूर राहण्याचा सल्ला देण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. निशिकांत दुबे सध्या झारखंडमधील गोड्डा मतदारसंघातून चौथ्यांदा लोकसभेचे प्रतिनिधित्व करत आहेत.

# नियमबाह्य खाणकाम थांबवण्याचा गोवा फाऊंडेशनचा इशारा

## पुढील आठवड्यात उच्च न्यायालयात दाखल करणार याचिका : क्लॉड अल्वारिस

■ टीम दैनिक हेराल्ड

**कळंगूट, दि. २० :** खाण कंपन्यांकडून नियम आणि कायद्यांचे उल्लंघन सुरूच राहिले तर राज्यातील खाणकाम पुन्हा थांबवण्याची आवश्यकता भासू शकते, असा इशारा गोवा फाऊंडेशनचे संस्थापक क्लॉड अल्वारिस यांनी दिला आहे. पिळर्ण येथील गोवा म्युझियम मधील एका कार्यक्रमात बोलताना डॉ. क्लॉड यांनी मूळगाव आणि डिचोलीमध्ये खाण कंपन्यांकडून सुरू असलेल्या उल्लंघनांवर प्रकाश टाकला. याबाबत गोवा फाऊंडेशन पुढील आठवड्यात उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचेही सुतोवाच त्यांनी केले.

गोवा फाऊंडेशनचे संस्थापक क्लॉड अल्वारिस यांनी पुन्हा एकदा राज्यातील खाण कंपन्यांना इशारा दिला आहे. खाण कंपन्या सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करत नाहीत, हे मुळगाव आणि डिचोलीच्या घटनांवरून दिसून आले आहे. जर हे असेच चालू राहिले तर पुन्हा एकदा खाणकाम बंद करावे लागेल, असा इशारा अल्वारिस यांनी दिला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे स्पष्ट उल्लंघन झाले आहे. अशा स्थितीत खाणकाम पुन्हा थांबवले जाईल आणि आम्ही याबाबत पुढील आठवड्यात याचिका दाखल करणार आहोत, असे अल्वारिस यांनी पिळर्ण येथील गोवा संग्रहालयातील एका कार्यक्रमात बोलताना सांगितले.

शाह आयोगाने २०१२ मध्ये गोव्यातील खाणकामात राजकारणी, नोकरशहा आणि भाडेपट्टेदारांच्या बेकायदेशीर संगनमताचे रॅकेट उघडकीस आणले



होते. याबद्दल आयोगाने व्यवस्थेचे संपूर्ण पतन असल्याचे सांगितले. तसेच, २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील नैसर्गिक संसाधनांवर होणाऱ्या अत्याचाराचा निषेध केला होता. खाणकाम भाडेपट्ट्यांच्या लिलावामुळे परिस्थितीत काही सुधारणा झाली असली तरी, प्रत्येकजण काढलेल्या खनिजाचे कमीत कमी मूल्यांकन करत आहे, असा आरोप अल्वारिस यांनी केला.

ते पुढे म्हणाले की, गोव्यातील खनिज संसाधने राज्यातील लोकांची आहेत आणि त्यांच्याच मालकीच्या आहेत. २०१९ च्या राष्ट्रीय खनिज धोरणानुसार खनिजांना सामायिक वारसा म्हणून घोषित केले गेले आहे. या धोरणानुसार राज्य सरकार एक विश्वास म्हणून कार्य करेल आणि खाणकामातून मिळालेल्या सर्व पैशांचा उपयोग एक ट्रस्ट तयार करून लोकांना नियमित लाभांश देण्यासाठी किंवा नॉर्वेसारख्या देशांप्रमाणे समाजाच्या भल्यासाठी केला जाईल हे पाहणे आवश्यक आहे.

गोव्यातील खाण भाडेपट्ट्यांची सुरुवात पोर्तुगीज राजवटीत १९२९ मध्ये झाली होती. त्यावेळी ८०० खाण भाडेपट्टे ओळखले गेले होते, मात्र त्यापैकी केवळ १२० भाडेपट्टे कार्यान्वित झाले आणि त्यापैकी कोणत्याही कंपनीने सरकारला रॉयल्टी दिली नाही, असे अल्वारिस यांनी सांगितले.

गोवा मुक्तीनंतर १९६१ मध्ये खाण कंपन्यांमध्ये मालकीच्या हक्कांबाबत वाद निर्माण झाले होते, विशेषतः भारत सरकार आणि कंपन्यांमधील विजयाच्या सिद्धांतामुळे. १९८७ मध्ये सरकारने खाण कंपन्यांच्या मालकीचे हक्क रद्द करण्यासाठी एक कायदा आणला आणि त्यानंतर कंपन्यांनी खाणधातूंवर रॉयल्टी देण्यास सुरुवात केली. २००८ मध्ये रॉयल्टीचा दर १५% पर्यंत वाढवला गेला, आणि रॉयल्टी देयके २०-३० कोटी रुपयांवरून ९०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचली.

सध्याच्या लिलाव प्रक्रियेने खाण कंपन्यांना पुन्हा खाणकाम सुरू करण्यास परवानगी दिली आहे, ज्यामुळे खाणकामातून होणारा महसूल सुमारे ५५,००० कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे, अशी माहिती गोवा फाऊंडेशनचे राहुल बोस यांनी दिली. त्यांनी सांगितले की, खाणकामातील आर्थिक निष्पक्षता, पर्यावरण संरक्षण, आणि गोव्यातील सर्व वास्तविक मालकांसाठी न्याय्य वाटा सुनिश्चित करणारे घटनात्मक आदेशांचे पालन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.